MHAU060018032012

03:35:06 PM



नि.दि. दावा क्र.२६६/२०१२

सांडु सखाराम वि  शशिकांत साहेबराव

निशाणी क्र. ११ लगत

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ याचा पुढील सरतपास विधिज्ञ पी.एस.भोकरे यांच्यामार्फत**

२ मी या कामी निशाणी १६ येथे गट क्रं. ३७६ याचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. या कामी निशाणी १७ येथे मोजणी पंचनामा दाखल करण्यात आला असून त्यावर साक्षीदार म्हणून मी सही केलेली आहे. सदर पंचनामा दिनांक ०५/११/२०१२ रोजीच्या मोजणी बाबत झालेला आहे. मी त्यावेळेस स्वतः हजर होतो. या कामी निशाणी १८ येथे मोजणी नकाशा दाखल करण्यात आला आहे. या कामी निशाणी ७९ येथे अनुक्रमांक १ येथे ७/१२ उतारा दाखल करण्यात आलेला असून सदर दस्त हा सार्वजनिक दस्त असल्याने त्यास **निशाणी क्रं. ८०** देण्यात येते. निशाणी ७९/२ व ३ येथे पोस्टाच्या पावत्या व पोहोच याची प्रमाणित प्रति दाखल केलेल्या आहेत. निशाणी ७९/४ येथे नियमित दिवाणी अपिल १४५/२०१८ निशाणी १ ची प्रत दाखल केलेली आहे. सदर दस्त हा सार्वजनिक दस्त असल्याने त्यास **निशाणी क्रं. ८१** देण्यात येते. त्यानंतर निशाणी ७९/५ येथे हक्कसोड पत्राच्या सही शिक्याची नक्कल दाखल करण्यात आलेली असून सदर दस्त हा सार्वजनिक दस्त असल्याने त्यास **निशाणी क्रं. ८२** देण्यात येते. निशाणी ७९/६ येथे रस्ता वहिवाट केस नं ९/२०१६ मधील निकालाची सही शिक्याची नक्कल दाखल करण्यात आलेली असून सदर दस्त हा सार्वजनिक दस्त असल्याने त्यास **निशाणी क्रं. ८३** देण्यात येते.  निशाणी ७९/७  ते १३ येथे दाव्याच्या संबंधीत असणा–या कागदपत्रांच्या छायांकित प्रति दाखल केलेल्या आहेत.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. पी.बी.भुसारे यांच्यामार्फत**

३.		माझे शिक्षण एम.एस्सी., पी.एच.डी. झालेले आहे. मी शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे १९९६ पासून नोकरी करतो. गट क्रं. ३७६ ही जमीन वडिलोपार्जित आहे. हे खरे आहे की, प्रतिवादी यांची गट क्रं. ३७३ ही वडिलोपार्जित जमीन आहे. गट क्रं. ३७६ चा मुळ सर्वे नं. १०१ होता. गट क्रं. ३७६ सर्वे नं.१०१ चा पोट हिस्सा क्रं. ८ व ९ चा मिळून झालेला आहे. गट क्रं. ३७६ चे क्षेत्र १ हे.९७ आर आहे. हे खरे आहे की, गट क्रं. ३७३ हा गट उत्तरेकडून पाहिल्यास इंग्रजी मधील एल अक्षराच्या उलटया स्वरूपात आहे.

४.		सर्वे नं. १०१ मध्ये १ नाला व १०२ मध्ये ४ नाले होते.

प्रश्नः– सर्वे नं.१०१ व १०२ याच्या सामायिक बांदावर नाला आहे?

उत्तरः– बांदावर नाही बांद संपल्यानंतर लागुन आहे.

हे खरे आहे की, सर्वे नं. १०१ व १०२ यांच्यामध्ये डोंगराकडून येणारा नाला आहे. हे खरे आहे की, तो नाला उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहतो. हे खरे आहे की, सर्वे नं. १०१ च्या पश्चिमेला नाला आहे. हे खरे आहे की, तो दक्षिणेकडून उत्तरेला तिरकस वाहतो. हे खरे आहे की, दोन्ही नाले कन्नड – सिल्लोड रस्त्याच्या येथे येवून मिळतात. हे खरे आहे की, नाला ज्या ठिकाणी जातो त्या रस्त्यावर पुल आहे. हे खरे आहे की, दोन्ही नाले ज्या ठिकाणी मिळतात तेथे वर लागुन प्रतिवादींची एक विहिर आहे.

प्रश्नः– गट क्रं. ३७६ मध्ये दक्षिण–पश्चिम कोप–यात तुमची विहिर आहे?

उत्तरः– ती बॉर्डरपेक्षा १०० फुट मध्ये आहे.

हे खरे आहे की, सदर विहिर दक्षिण–पश्चिम कोप–याच्या आत आहे.

प्रश्नः– गट क्र.३७३ हा विलास साहेबराव व दादाराव साहेबराव यांच्या ताब्यात आहे.

उत्तरः– ती सामायीक जमीन आहे. त्यामध्ये दादाराव व विलास यांची वहिती दिसते. त्यात पडिक जमीन आहे. पडिक क्षेत्रावर कोणाची वहिती दिसत नाही.

प्रश्नः– पडीक क्षेत्र तुम्हाला लागुन नाही?

उत्तरः– काही भाग लागुन आहे.

हे खरे आहे की, पडीक जमीन ही आमच्या जागेच्या दक्षिणेला लागुन नाही. गट क्रं. ३७६ च्या पूर्वेकडील नाला ५फुट खोल व त्याची रूंदी अंदाजे १०–१२ फुट आहे. मला हे सांगता येणार नाही की, प्रतिवादी क्रं. १ शशिकात यांचा गट क्रं. २७१ मध्ये ताबा आहे किंवा कसे.

५. प्रश्नः– तुमच्या जमीनीच्या दक्षिण बाजुला असणा–या प्रतिवादीच्या जमीनीपेक्षा तुमची जमीन उंच आहे?
उत्तरः– काही ठिकाणी १ फुट उंच आहे व काही ठिकाणी २–३ फुटाचा फरक आहे व काही ठिकाणी एक सारखी आहे.

६. माझ्याविरूध्द कन्नड न्यायालयात २ दावे आहेत. औरंगाबाद येथे माझ्याविरूध्द एक फौजदारी प्रकरण आहे. ते प्रकरण आत्महत्या बाबत केलेले आहे मात्र ते खोटे आहे. विष्णु बाबुराव आव्हाळे यांनी आत्महत्या केल्याबाबत ते प्रकरण आहे. त्यांचा गट क्रं. ३७५ आहे. शपथपत्रातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे तयार करण्यात आला असून तो खरा आहे. शपथपत्रातील माहिती मी दिली होती. शपथपत्रातील माहिती दिल्यानंतर तो मजकुर तयार झाला तो मी वाचला व त्यानंतर त्यावर सही करून तो न्यायालयात दाखल केला. माझ्या शपथपत्रात नमुद केल्याप्रमाणे ''माझे वडिल शेत गट क्रं. ३७६ क्षेत्र ४ हे. ३५ गुंठे मौजे हस्ता ता. कन्नडचे मालक असून सदर शेत आमच्या कब्जात असून आम्ही वहिती करत आहोत'' या मजकुरापैकी क्षेत्र चुकीचे नमुद केलेले असून आमच्या ताब्यामध्ये ४ हे. ३ गुंठे क्षेत्र आहे.

७. गट क्रं. ३७६ च्या पुर्वेला–शशिकांत शिंदे व ईतर, पश्चिमेला– रामदास काशिनाथ आव्हाळे व ईतर, उत्तरेला– सुनिता विष्णु आव्हाळे सद्यपरिस्थिती आहे, दक्षिणेला– शशिकांत शिंदे व ईतर. ईतर म्हणजे ७/१२ वरील नावाप्रमाणे असणारी व्यक्ती. हे खरे आहे की, प्रतिवादींच्या विरूध्द रस्त्याबाबतची कारवाई केली होती. मी

माझ्या क्षेत्रापासून मुख्य रस्त्यापर्यंत गट क्रं. ३७३ मधुन रस्ता मागितला होता. माझ्या जागेपासून दक्षीणेकडे मी रस्ता मागितला होता. तो रस्ता माझ्या म्हणण्याप्रमाणे पूर्वीपासूनचा वहिवाटीचा होता. तो रस्ता हस्ता ते निंभोरा असा जाणारा होता. तो पूर्वीपासूनचा म्हणजे जेव्हा १९७०–७२ साली नकाशे बनले तेव्हापासूनचा आहे. मी मागितलेला रस्ता हा कन्नड –पिशोर रस्त्यापासून सुरू होतो. तो रस्ता पुढे गट क्रं. ३७३ मधून गट क्रं. ३७० ला जातो. हे खरे आहे की, गट क्रं. ३७० हा आमच्या पूर्व–उत्तर दिशेला आहे. हे खरे नाही की, गट क्रं. ३७३ मधून गट क्रं. ३७६ मध्ये तो रस्ता येतो. साक्षीदार सांगतो की तो रस्ता गट क्रं. ३७३ मधून जातो मात्र गट क्रं. ३७६ च्या बाजुने जातो. तो रस्ता गट क्रं. ३७४ व ३७५ मधून जात नाही.

८. मोजणीच्या वेळी मी स्वतः हजर होतो. त्यावेळेस विलास साहेबराव शिंदे व ईतर पंच हजर होते. बाकीच्या लोकांमध्ये सुनिल बारकु विधाते व इतर लोक असतील. बरेच दिवस झाल्यामुळे मला ईतर लोकांची नावे सांगता येणार नाही. गट क्रं.३७६ च्या पुर्वेला असणारा नाला हा मी मोजणीदाराला दाखवला होता.

प्रश्नः– तुम्ही वहिवाटीचा रस्ता दाखवला होता का?

उत्तरः– त्यावेळेस रस्ता अस्तित्वात नव्हता.

रस्ता सन २०१८ मध्ये अस्तित्वात आला. आमच्या गटाच्या पश्चिमेकडे असणारा नाला मोजणीदाराला दाखवला होता. मोजणीदाराला आमची विहिर दाखवली होती. विहिरीवर विद्युत जोडणी घेतलेली आहे. विद्युत जोडणीकरीता एक पोल आहे. विद्युत जोडणी वडलांनी घेतलेली आहे. अंदाजे सन २००२–०३ च्या दरम्यान विद्युत जोडणी घेतली होती. विद्युत जोडणीचा खांब मोजणीदाराला दाखवला होता.

९. मोजणी ही फलक यंत्र (Plain Table)पध्दतीने केली होती. या मोजणीअगोदर गट क्रं. ३७६ ची मोजणी करण्यात आलेली नव्हती. मी केलेल्या

मोजणीच्या पुर्वी गट क्रं. ३७६ च्या बाजुच्या गटाची मोजणी झालेली नाही.

प्रश्नः–पश्चिमेकडील नाल्यावर नाला बंडींग (बंधारा) आहे का?

उत्तरः– त्यावेळेस नव्हती. आता बांधलेली असून तिचे पाणी आमच्या जागेत येते. सदर नाला बंडींग हे गट क्रं. ३७३ मध्ये बांधलेले आहे. त्याचे आडवलेले पाणी आमच्या विहिरीलगतच्या नाल्यापर्यंत येते. मोजणीच्या वेळेस गट क्रं. ३७६ मध्ये आंब्याची झाडं होती. मोजणीच्या वेळेस गट क्रं. ३७६ व ३७३ च्या बांदावर झाडं नव्हती. गट क्रं. ३७६ मध्ये मोजणीच्या वेळेस आंब्याची किती झाडं होती हे मला नेमकं सांगता येणार नाही. मोजणीचा नकाशा त्याच दिवशी तयार करण्यात आला.

१०. सांडु सखाराम आव्हाळे हे माझे वडील आहेत. हे खरे नाही की, साहेबराव दौलतराव शिंदे यांना गट क्रं. १०१/९ मध्ये दिड एकर जमीन माझ्या वडलांनी विक्री केली होती. हे खरे नाही की, त्याप्रमाणे माझ्या वडलांनी साक्षीदारांसमक्ष करारनामा लिहून दिला होता. हे खरे नाही की, सदर सन १९७२ साली विकली होती.

११. हे खरे नाही की, दिनांक ०५.११.२०१२ रोजी कोणत्याही प्रकारची मोजणी करण्यात आलेली नाही. हे खरे नाही की, मोजणीदाराशी संगनमत करून खोटा नकाशा तयार करण्यात आला. हे खरे नाही की, प्रतिवादीने कोणत्याही प्रकारचे अतिक्रण माझ्या जमीनीवर केलेले नाही. हे खरे नाही की, प्रतिवादी यांना मोजणी बाबत कोणत्याही प्रकारची नोटीस देण्यात आलेली नाही. हे खरे नाही की, चुकीच्या व खोट्या नकाशाच्या आधारे प्रतिवादी यांच्याविरूध्द खोटा दावा दाखल केलेला आहे. हे खरे नाही की, अभिलेखाप्रमाणे गट क्रं. ३७६ चे पूर्ण क्षेत्र आजही माझ्या ताब्यात आहे. हे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2024.11.11 17:51:40 +0530

(वि. द. पाटील)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कन्नड.

कन्नड.
दिनांक : ११/११/२०२४
04:41:19 PM